‘‘भले व्हा, भले करा’’ या विषयावरील सर्वोत्कृष्ट भाषणास परीक्षकांनी शिफारस केल्यासच रू.२५००/- चा विशेष पुरस्कार दिला जाईल, अन्यथा नाही.

अठरावी राज्यस्तरीय आंतर शालेय निबंध स्पर्धा

१) प्रथम क्रमांक - भारवी पाटील
(शाळा सुलोचना नातू विद्यामंदिर, पुणे)

२) द्वितीय क्रमांक समृद्धी भाटवडेकर
(शाळा पार्ले टिळक विद्यालय, मुंबई)

३) तृतीय क्रमांक : विधी राहूल मणेरे,
(शाळा परांजपे विद्यामंदिर, पुणे

४) उत्तेजनार्थ : अ) आर्याणी निरंजन खैरे
(शाळा सुलोचना नातू विद्यामंदिर, पुणे)

ब) गणक उदय देशपांडे
(शाळा सुलोचना नातू विद्यामंदिर, पुणे)



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत-

✻ ऑगस्ट २०२४ चा सत्संग २८ तारखेला झाला.

✻ ‘दिव्य जीवन’ या आपल्या मासिक पत्रिकेचा ऑगस्ट महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना पाठविण्यात आला.



**पुणे शाखेचा पत्ता**
श्री.नितीन देशपांडे
‘ईशावास्य’ प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७


बुक पोस्ट


प्रति,



# दिव्य जीवन




पुणे शाखा
वर्ष १९ / अंक ०९
सप्टेंबर २०२४

Meditation releases a great amount of spiritual power. By constant meditation on the Self, one attains liberation.

**Swami Sivananda**

Worry presupposes a basic lack of faith in the intelligence, goodness and justice of the Universal Being. If you trust in that Being and know that He is always with you and His plan for you is only for your highest good, then this trust will make the worry superfluous.

**Swami Chidananda**

## महिन्याचा विचार :

आपले ध्यान करणाऱ्या साधकाचे कल्याण आणि योगक्षेम बघण्याचा वायदा भगवंत करीत असतो. गुरूदेवांनी आपल्या सदय मार्गाने हे दाखवून दिलेले आहे की, सततचे नामस्मरण साधकाला काळजी आणि चिंतामुक्त ठेवते आणि संपूर्ण स्वातंत्र्य बहाल करते. जी मंडळी शिवानंदनगरवर प्रेम करतात, तेथील सुविधांचा लाभ घेत त्यांचे कौतुक करतात, त्यांनी हे क्षणभरही विसरू नये की येथील प्रत्येक इमारतीच्या विटेवर एकाच व्यक्तीचे नांव कोरलेले आहे. इथे चालणाऱ्या असंख्य उपक्रमांचे अस्तित्व एका आणि एकाच व्यक्तीचे नांव कोरलेले आहे. त्यांनी ऋषिकेश येथे अक्षरक्ष: एका वस्त्रावर प्रवेश केला होता आणि खिशात एकही दमडी नव्हती पण आपल्याला भक्तीचे महात्म्य समजून सांगण्यासाठी त्यांनी अनेक मार्गांनी जगन्नियंत्याची भक्ती केली, सेवा केली आणि आज तेथे एक टोलेजंग आणि विश्वाच्या कौतुकास पात्र झालेली संस्था उभी राहिलेली आहे.



एकदा महामहोपाध्याय पंडित चिन्नास्वामी शास्त्री (कोलकत्याच्या संस्कृत महाविद्यालयाचे माजी प्राचार्य) म्हणाले – '' दैवी शक्ती आणि दैवी कृपा शिवानंदांना वश आहे. अन्यथा एवढ्या कमी अवधीत कोणतीही व्यक्ती इतकं प्रचंड कार्य करूच शकली नसती.

तंजोरचे महाकवी सुंदरेशा शर्मा या विधानाशी सहमत आहेत. ते म्हणतात – ''ईश्वर शक्ती किंवा दैवी शक्ती शिवानंदांना साहाय्य करीत असते. त्यांनी खूप आराधना केलेली आहे. म्हणूनच त्यांना इतके उत्तुंग अध्यात्मिक कार्य करता आले. इतर व्यक्ती अशा कार्याच्या आसपासही जाऊ शकणार नाही.''

महामंडलेश्वर श्री स्वामी कैलास आश्रमाचे विष्णूनंदजी महाराज(ज्यांनी स्वामी शिवानंदजींना संन्यासदीक्षा दिली) म्हणतात–'काही वर्षांपूर्वी इथे घनदाट जंगल होतं. वाघ निर्धास्तपणे इथे फिरत असत. शिवानंदांनी जंगलाचे रूपांतर मंगलात(पवित्र स्थान) केले. त्यांचे थोर अध्यात्मिक कार्य हे फक्त त्यांनी केलेल्या ईश्वराच्या आराधनेमुळे झालेले आहे.

(क्रमश:)



**विसावी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२४**

**स्पर्धेविषयी माहिती :**

**दिनांक २२ सप्टेंबर २०२४, (रविवार) वेळ दु.२ वा.**

**स्थळ : ना.सी.फडके सभागृह, ४२, विजयानगर कॉलनी, नीलालम चित्रपटगृहाजवळ, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**

**विषय :**

**१) भगवतगीता एक मानसशास्त्रीय ग्रंथ.**
**२) वलयांमागचे संघर्ष**
**३) आर्थिक साक्षरता**
**४) संगीतोपचार,**
**५) शिक्षण खर्च आणि शैक्षणिक गुणवत्ता**
**६) 'भले व्हा, भले करा'(विशेष पुरस्कारासाठी)**

**पारितोषिके :–**

**कै.दादा देशपांडे स्मृती : प्रथम पुरस्कार रू.२५००/–**
कै.ताई देशपांडे स्मृती : द्वितीय पुरस्कार रू.२०००/–
कै.सुमन गांगल स्मृती : तृतीय पुरस्कार रू.१५००/–
उत्तेजनार्थ – प्रथम पुरस्कार – रू. ५००/–
उत्तेजनार्थ – द्वितीय पुरस्कार – रू. २५०/–